(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या निर्णयाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**<u>वनजमिन-पालघर</u>**

**वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मे.गुजरात गॅस लिमिटेड, अहमदाबाद यांना डहाणू तालुका क्षेत्र व सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १० इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता मौजे-सारणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील ०.०३५१ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळतेकरणाबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन आदेश क्रमांकः एफएलडी- १२अ१८/प्र.क्र.१४८/फ-१०**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: २०/०३/२०१९

**<u>वाचा :-</u>**

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२५९१/(६२)/६६/२०१७-१८, दिनांक ०६/०४/२०१८.

२) शासन आदेश समक्रमांक, दिनांक १५/०५/२०१८.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२५९१/(६२)/१८५७/२०१८-१९, दिनांक ०८/०१/२०१९.

**<u>प्रस्तावना :-</u>**

मे.गुजरात गॅस लिमिटेड, अहमदाबाद, गुजरात यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत डहाणू तालुका क्षेत्र व सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १० इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता मौजे-सारणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील एकूण ०.०३५१ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या वन विभागास सादर केला होता. सदर प्रस्तावास वरील अ.क्र.२ येथील शासन आदेशान्वये तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे. त्यातील अटींची पूर्तता केल्यानंतर या प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन आदेश :-</u>**

१. भारत सरकारच्या आदेश क्रमांक-एफ.नं.११-९/९८/एफसी, दिनांक १६/१०/२००० व दिनांक ०७/११/२०१४ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, कलम-२ (ii) अंतर्गत डहाणू तालुका क्षेत्र व सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १० इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता मौजे-सारणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील एकूण ०.०३५१ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास **तत्वत: मंजूरी** प्रदान केली होती.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वरील अ.क्र.३ येथील पत्रान्वये वरील तत्वत: मंजूरी आदेशातील अटींचा अटीपूर्तता अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अटीपूर्तता अहवाल विचारात घेऊन तसेच वरील परिच्छेदात नमूद केलेल्या भारत सरकारच्या आदेशान्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासन याद्वारे, वन (संवर्धन) अधिनियम, १९८०, कलम-२ (ii) अंतर्गत डहाणू तालुका क्षेत्र व सभोवतालच्या परिसरात नैसर्गिक वायू वितरण नेटवर्क उभारणेकामी १० इंच व्यासाची स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता मौजे-सारणी, ता.डहाणू, जि.पालघर येथील एकूण ०.०३५१ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळतीकरण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२५९१/(६२)/६६/२०१७-१८, दिनांक ०६/०४/२०१८ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास **अंतिम मंजूरी** देत आहे. वनजमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अनु.क्र. | गावाचे नाव | तालुका व जिल्हा | सर्व्हे नंबर | वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| १. | सारणी | तालुका-डहाणू<br>जिल्हा-पालघर | २१५ | ०.०३५१ | राखीव वने |

३. <u>सदर अंतिम मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.</u>

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) मौजे-भराड, तालुका-डहाणू, जि.पालघर येथील कंपार्टमेंट नंबर-२३९ मधील १.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर प्रकल्प यंत्रणेस स्व:खर्चाने पर्यायी वनीकरण करावे लागेल.

३) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

४) भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प यंत्रणेस ०.०३५१ हेक्टर वनक्षेत्राकरीता अनुज्ञेय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

५) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार/ सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरावी लागेल.

६) पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित क्षेत्राचे सर्व्हेक्षण, सीमांची आखणी व निश्चिती, कायमस्वरुपी खांब उभारणे इत्यादींचा खर्च प्रकल्प यंत्रणेस अदा करावा लागेल.

७) रस्त्याच्या कडेने पाईपलाईन टाकण्याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांची पूर्व परवानगी प्राप्त करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

८) आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाव्दारे पर्यावरणीय मंजूरी प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

९) प्रस्तावित वनक्षेत्रातून नैसर्गिक वायूची पाईपलाईन पुरेश्या सुरक्षिततेच्या उपायांसह प्रमाणित मानकांनुसार भूपृष्ठापासून खोलवर टाकली जाईल.

१०) प्रस्तावित प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असणा-या साधनसामुग्रीची ने-आण करणेसाठी वनक्षेत्रात कोणताही अतिरिक्त/ नवीन रस्ता तयार करण्यात येऊ नये.

११) प्रकल्पाचे काम करतेवेळी मजूर व इतर कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहचणार याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

१२) प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पास लागू असण्या-या सर्व संबंधित कायद्यांतील तरतुदी, नियम व मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

१३) उपरोक्त नमूद केंद्र शासनाच्या पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून ही अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

१४) वन विभागाने घातलेल्या सर्व अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

१५) शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक असेल.

१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

१७) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे परवानगीशिवाय प्रस्तावित वनजमिनीवर काम सुरुवात करण्यात येऊ नये.

१८) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमिन वळतीकरणास अंतिम मंजूरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

१९) उपरोक्त नमूद केंद्र शासनाच्या पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून ही अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

२०) वर नमूद केलेल्या शासनाच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे खात्री करतील व याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२१) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित वन

अधिकारी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांतील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१२४१३६०६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810,
postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.03.20 12:56:13 +05'30'

( वीरेन्द्र तिवारी )

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत,**

१. सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. विभागीय आयुक्त, कोकण.
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
१०.जिल्हाधिकारी, पालघर.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर.
१२.उपवनसंरक्षक, डहाणू.
१३.मे.गुजरात गॅस लिमिटेड, २ शांतीसदन सोसायटी, परिमल गार्डन जवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद, गुजरात-३८० ००६.
१४.निवडनस्ती (फ-१० कार्यासन).

२. जिल्हाधिकारी, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर व उपवनसंरक्षक, डहाणू यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील

निर्णय त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. मे.गुजरात गॅस लिमिटेड, २ शांतीसदन सोसायटी, परिमल गार्डन जवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद, गुजरात यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि महाराष्ट्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे व उप वनसंरक्षक, डहाणू यांना सादर करण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

**<u>Forest Land- Palghar</u>**
**Diversion of 0.0351 Ha. of Reserved Forest land at Village-Sarani, Tal.Dahanu, Dist.Palghar under Forest (Conservation) Act, 1980 in favour of M/s Gujarat Gas Limited, Ahmedabad for laying of 10" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Dahanu Taluka & surrounding area in Palghar district.**

# Government of Maharashtra

## Revenue and Forest Department

## Government Order No.: FLD-12A18/CR-148/F-10

Mantralaya, Mumbai - 400 032

Date: 20/03/2019

**<u>Read -</u>**

1. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur’s letter No. Desk-17/NC/II/I.D.-12591/(62)/66/2017-18, dated 06/04/2018.
2. Government Order of even no. Dated 15/05/2018.
3. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur’s letter No. Desk-17/NC/II/ID-12591/(62)/1857/2018-19, Dated 08/01/2019.

**<u>Preamble -</u>**

M/s Gujarat Gas Limited, Ahmedabad, Gujarat has submitted a proposal for diversion of 0.0351 Ha. of Reserved Forest land at Village-Sarani, Tal.Dahanu, Dist.Palghar under Forest (Conservation) Act, 1980 for laying of 10" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Dahanu Taluka & surrounding area in Palghar district, to the State Forest Department. Government of Maharashtra, vide its Government Order referred at Sr.No.2 above has granted 'in-principle' approval to that proposal. After complying with the conditions laid down in the order of 'in-principle' approval, it was under consideration of the Government to grant 'formal approval' to the above diversion.

**<u>Order -</u>**

1. In exercise of powers delegated to the State Governments, vide Government of India’s order no. F.No.11-9/98-FC, dated 16/10/2000 and dated 07/11/2014 Government of Maharashtra has granted '**in-principle'** approval for diversion of 0.0351 Ha. Reserved Forest land at Village-Sarani, Tal.Dahanu, Dist.Palghar under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980 for laying of 10" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Dahanu Taluka & surrounding area in Palghar district, vide its Government Order referred at Sr.No.2 above to the proposal submitted by Additional

Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter at reference Sr.No-1.

2. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at Sr.No.3 has submitted the compliance report of the conditions mentioned in 'in-principle' approval Order. After careful consideration of the compliance report and in exercise of powers delegated to the State Governments, vide Government of India's orders mentioned hereinabove, This Government is pleased to grant **'formal approval'** to the diversion of 0.0351 Ha. Reserved Forest land at Village-Sarani, Tal.Dahanu, Dist.Palghar under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980 for laying of 10" diameter Steel Pipeline to set up Natural Gas Distribution Network in Dahanu Taluka & surrounding area in Palghar district as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur's letter No. Desk-17/NC/II/I.D.-12591/(62)/66/2017-18, dated 06/04/2018. The details are as given below:-

| Sr.No. | Village Name | Tehsil & District | Survey Number | Forest Area (in Hectare) | Legal Status |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Sarani | Tehsil-Dahanu District-Palghar | 215 | 0.0351 | Reserved Forest |

**3. <u>This formal approval is issued subject to the following conditions-</u>**

1) The legal status of the land will remain unchanged.
2) Compensatory Afforestation will be raised at the cost of the User Agency on 1.00 Ha. degraded forest land at Compartment No.239 of Village-Bharad, Tal.Dahanu, Dist.Palghar.
3) The Forest land shall not be used for any purpose other than specified in the project.
4) The User Agency will defray the cost of Net Present Value of 0.0351 Ha. of Forest Land as per latest guidelines of Government of India.
5) The User Agency will defray the additional/ revised cost of Net Present Value as per latest guidelines of Government of India.
6) The User Agency will pay cost of survey, demarcation and erection of permanent pillars on the Compensatory Afforestation land.
7) The User Agency shall obtain the permission of Executive Engineer, PWD, Palghar for laying of pipeline within Road ROW.
8) The User Agency will obtain the Environmental Clearance from competent authority, if required.
9) The Natural Gas Pipeline will be laid well below as per the norms the ground level all along its length through forest and adequate safety measures to be adopted.

10) No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for the execution of the project work.
11) It will be the responsibility of the User Agency to ensure that the labourers, staffs engaged in construction activity do not damages nearby forest flora and fauna.
12) Provision of all relevant Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.
13) This final approval is also subject to the terms and conditions mentioned in the Government of India's letter referred to here-in-above is binding on User Agency.
14) All the conditions stipulated by the Forest Department shall be binding on the User Agency.
15) Any other conditions stipulated by Government time to time will be binding to User Agency.
16) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.
17) No work should be started on the proposed forest land without prior permission of the Chief Conservator of Forests (T.), Thane.
18) The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T), Thane.
19) This sanction is granted subject to the compliance of the conditions mentioned in Government of India's letters mentioned in Para-1 and conditions mentioned in the order of in-principle approval by the User Agency and it is mandatory for the User Agency to comply all these conditions.
20) The User Agency shall comply with all the conditions stipulated in the 'in-principle' and 'formal approval' letters of Government Orders of Government of Maharashtra. The Chief Conservator of Forests (Territorial), Thane shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency and he will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
21) Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests / Deputy Conservator of Forests shall report through the State Government to Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office (WCZ), Ground Floor, East Wing, New Secretariat Building, Civil lines, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

3. This Government Order of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201903201241360619. This Order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

VIRENDRA
RAMBAHAL
TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032,
street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI,
ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.03.20 12:57:29 +05'30'

**( Virendra Tiwari )**
**Additonal Principal Chief Conservator of Forests**
**(Mantralaya)**

**Copy forwarded to:**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central zone, Government of India, Nagpur.
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
7. Commissioner, Kokan Division.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (T), Thane.
10. Collector, Palghar.
11. Chief Executive Officer, Zilla Parishad, Palghar.
12. Deputy Conservator of Forests, Dahanu.
13. M/s Gujarat Gas Limited, 2 Shantisadan Society, Near Parimal Garden, Ellisbridge, Ahmedabad, Gujarat-380 006.
14. Select File-F-10.

2. Collector, Palghar, Chief Executive Officer, Zilla Parishad, Palghar and Deputy Conservator of Forests, Dahanu are hereby directed to forward the copy of this Order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this Order on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. M/s Gujarat Gas Limited, 2 Shantisadan Society, Near Parimal Garden, Ellisbridge, Ahmedabad, Gujarat are hereby directed that they should publish the entire Order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No.etc. and along with the conditions and

safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial), Thane & Deputy Conservator of Forests, Dahanu.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.